नियमित फौजदारी खटला क्र.१३९/२०१५
सरकार वि. निवृत्ती वगैरे
निशाणी क्र.– ५०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ चा पुरावा**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,
माझे नाव — रेवन्नाथ कारभारी रांझणे,
वय — ५९ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त,
राहणार — खामगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**सर तपासणी**

**अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

**१.** सन २०१४ साली मी पाथर्डी पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत होतो. दिनांक १८/०७/२०१४ रोजी दिवशी माझ्याकडे गु.र.क्र. २४/२०१४ भा.दं.वी.कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ चा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. तपासाकरीता माझ्याकडे फिर्याद, दैनिक अहवाल व प्रथम खबरी अवालाची प्रत देण्यात आली होती. त्यानंतर घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावरती माझी तसेच पंचांच्या सहया आहेत. **घटनास्थळ पंचनाम्यास निशाणी ५१ देण्यात** येते. त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. **साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर व प्रकाश बाबासाहेब खेडकर यांचा जबाब** मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांचे **जबाबातील साक्षांकित भाग अ** मला दाखविण्यात आले. तो त्यांच्या सांगणेप्रमाणे नोंदविला असून खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी ५२ व ५३ देण्यात** येते. त्यानंतर मी गुन्हयातील आरोपींना हजर राहण्याबाबत नोटीस दिली. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आजरोजी न्यायालयात आरोपी क्र.१ हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. खेडकर यांचेकडुन सुरु**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केला नसुन फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे खोटा तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांच्या घरातील लोकां व्यतिरीक्त इतर लोकांचे जबाब मी नोंदवले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर व प्रकाश बाबासाहेब खेडकर यांच्या जबाबातील निशाणी–५२ व ५३ मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या पतीने माझ्याविरुध्द देखील अनेक तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या

दडपणाखाली येऊन खोटा तपास करुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.03.17 17:37:52 +0530

पाथर्डी.

दिनांक – १७/०३/२०२६.

**(रविकिरण सपाटे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र. १, पाथर्डी.